वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, धरमपेठ, नागपूर ४४००१०
E Mail : vanamati.cptp@gmail.com

क्र. नामिका०६२६/सीपीटीपी/आस्था/२२६९ /२०२६, दि. ०८ .०६.२०२६

## जाहिरात

### एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत तज्ञ व्यक्तींचे अर्ज मागविण्याबाबत

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत उत्तीर्ण होणा-या गट -ब परिविक्षाधीन अधिका-यांसाठी एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत दोन वर्षाच्या प्रशिक्षण कालावधीत शासनाचे प्रशासकीय कामकाजास पूरक ठरेल असा दोन वर्षाच्या कालावधीचा Master of Arts in Development Administration- M.A. Specialization (विशेषीकरणासह) हा Gokhale Institute of Politics and Economics, Pune यांचा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम राबविण्यासाठी वनामती, नागपूर या संस्थेस प्राधिकृत करण्यात आले आहे. वनामती संस्थेतील सीपीटीपी अंतर्गत अभ्यासक्रम तयार करणे, विषय निहाय तासिका घेणे, प्रश्नपत्रिका तयार करणे, उत्तर पत्रिका तपासणे, Moderation, गुणपत्रक, निकालपत्रक तयार करणे, व इतर अनुषंगिक कामे यासाठी १)Law And Judicial Process आणि २)Economics And Project Management या विषयातील तज्ञ व्यक्ती व प्रशिक्षण कामकाजाविषयक अनुभव असलेल्या व्यक्ती यांच्याकडून प्रशिक्षण समन्वयक कामासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. एकत्रित परिविक्षाधिन प्रशिक्षण कार्यक्रमामधील प्रशिक्षण (सेमिस्टर1) करिता १)Law And Judicial Process आणि २)Economics And Project Management विषयावर प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण द्यावयाचे आहे. त्यासाठी Law And Judicial Process या विषयातील तज्ञ व्यक्ति - संख्या ०१ व Economics And Project Management या विषयातील तज्ञ व्यक्ति - संख्या ०१ आवश्यकता आहे. या दोन्ही विषयातील तज्ञ व्यक्तिची पात्रता :

१)वयोमार्यादा : **६५ वर्षे**

२)Law And Judicial Process साठी शैक्षणिक पात्रता : L.L.M

३)Economics And Project Management साठी शैक्षणिक पात्रता: M.A., M.Phl.

विषयातील **उच्च शैक्षणिक पात्रता व प्रशिक्षणाचा अनुभव यास प्राध्यान्य** देण्यात येईल. शैक्षणिक अर्हता, वय व अनुभव यासबंधी आवश्यक कागदपत्रांच्या साक्षाकित प्रती जोडाव्या.

एकत्रित परिविक्षाधिन प्रशिक्षण कार्यक्रमामधील पायाभूत प्रशिक्षण दरम्यान प्रशिक्षण समन्वयक यांचाकडे खालील कामे सोपविण्यात येतील:

१) प्रशिक्षण कार्यक्रमानुसार प्रशिक्षणाचे वेळापत्रक निश्चित करणे.

२) प्रशिक्षणाचे वाचन साहीत्य तयार करणे.

३) प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षण वर्गाचे नियंत्रण करणे.

४) प्रशिक्षणादरम्यान आयोजित करावयाच्या बाहयस्थ /आमंत्रित व्याख्यात्यांचे पॅनल तयार करून त्यांना वेळोवेळी आवश्यकतेनुसार व्याख्यानासाठी आमंत्रित करणे.

५) परिक्षेसंदर्भात प्रश्नप्रत्रिका तयार करणे, उत्तर पत्रिकांची तपासणी करणेबाबत व्यवस्था करणे.

प्रशिक्षणाच्या कामाची निकड पाहून प्रशिक्षण समन्वयकास नियुक्ती देण्यात येईल व आवश्यकतेनुसार नियुक्ती कालावधीत वाढ करण्यात येईल

करार पध्दतीने नियुक्त करण्यात येणा-या प्रशिक्षण समन्वयकास वनामती नियामक मंडळाने ठरविलेल्या रु 45,000/- प्रतिमाह च्या मर्यादेपर्यंत पारिश्रमिक देण्यात येईल. प्रशिक्षण समन्वयकांचा अनुभव व त्यांच्या विषयाबाबतचा अभ्यास याचा विचार करून पुढील नियुक्तीबाबत वेळोवेळी विचार करण्यात येईल.

इच्छुक तज्ञ व्यक्तींनी 23-06-26 या दिनांकपूर्वी पूर्वी आपले अर्ज खालील पत्त्यावर सादर करावेत किंवा ईमेल करावा.

पत्रव्यवहाराचा पत्ता - संचालक, वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन व प्रशिक्षण संस्था व्हीआयपी रोड, धरमपेठ, नागपूर 440010

ई मेल - vanamati.cptp@gmail.com

**अर्जाचा नमुना**

वनामती, नागपूर संस्थेत प्रशिक्षण समन्वयकाचे काम मिळण्याबाबत करावयाचा अर्ज

पासपोर्ट साइज फोटो

१. अर्जदाराचे संपूर्ण नाव :-------------------------------------------------------

२. निवासी पत्ता :------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------------

३.भ्रमणध्वनी कमांक : :

४.शैक्षणिक अर्हता :

५.अनुभव :

६.जन्मदिनांक व दि.०१.०७.२०२६ रोजीचे वय :

७.प्रशिक्षण समन्वयकाचे कामासाठी आवश्यक अनुभव असल्यास त्याचे विवरण :

-----------------------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------------

दिनांक :

सहपत्र : अर्जदाराची स्वाक्षरी